श्री.संजय ना. महागांवकर, (निलंबित) सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव, जिल्हा परिषद वाशिम यांना पदस्थापना देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन आदेश क्रमांकः मविसे-१०/प्र.क्र.१४/२०१९/आस्था-३ (अ)
मंत्रालय, बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, मुंबई - ४०० ००१.
तारीख: ११ जून, २०१९.

संदर्भ :- शासन आदेश ग्रामविकास विभाग क्र.मविसे ५३१७/प्र.क्र.१७४/आस्था-२/दि.२५.१.२०१९

शासन आदेश :-

उपरोक्त संदर्भिय शासन आदेशान्वये श्री.संजय नामदेव महागांवकर (निलंबित) सहाय्यक गट विकास अधिकारी, गट-ब पंचायत समिती मालेगांव, जिल्हा परिषद, वाशिम यांना न्यायालयीन निर्णयाच्या व विभागीय चौकशीच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून शासन सेवेत पुर्न:स्थापित करुन त्यांना अकार्यकारी पदावर नियुक्ती देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार श्री.महागांवकर यांना सेवेत पुर्न:स्थपित केल्यानंतर सहाय्यक गट विकास अधिकारी (म.ग्रा.रो.ह.यो.) जिल्हा परिषद अकोला या पदावर पदस्थापना देण्यांत आली आहे. तथापि,सदर पदावर श्री.महागांवकर हजर झालेले नाहीत. श्री.महागांवकर, सहा.ग.वि.अ. यांनी त्यांचे मुळ गांव अकोला जिल्हयात असल्याने पदस्थापनेत बदल करुन देण्याबाबत विनंती केलेली आहे. त्यामुळे श्री.महागांवकर यांना सहा.ग.वि.अ. (म.ग्रा.रो.ह.यो.) जि. अकोला या ऐवजी सहाय्यक प्रकल्प अधिकारी (रोजगार) जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, जिल्हा बुलढाणा या पदावर अंशत: बदल करुन पदस्थापना देण्यांत येत आहे.

२. श्री.सं.नां.महागांवकर यांनी पदस्थापनेच्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. त्यांनी अनधिकृतपणे रजेवर जावू नये.

३. विभागीय आयुक्त अमरावती व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांनी श्री.महागांवकर यांना पदस्थापनेच्या पदावर रुजू करुन घेऊन याबाबत शासनास अवगत करावे..

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६११११२७५८८६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA NATHA SAVANE

Digitally signed by RAJENDRA NATHA SAVANE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=0a2ac5ab6ca0075cc776c90ec03925f2eb8727640eacf311beb6f68d63939303, postalCode=400032, street=MANTRALAYA , MUMBAI, serialNumber=f049989dbbef93340e9edd88af960a0963746d42baa5c948405b62e821529a99, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJENDRA NATHA SAVANE
Date: 2019.06.11 15:34:48 +05'30'

(रा.ना.सवने)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
२) मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
३) मा. प्रधन सचिव (ग्राम विकास व पंचायत राज).
४) विभागीय आयुक्त, अमरावती.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला/बुलढाणा/वाशिम
६) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अकोला/बुलढाणा
७) महालेखापाल- २ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई.
८) संबंधित अधिकारी (द्वारा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम)
९) कार्यासन, आस्था-२, ग्राम विकास विभाग
१०) निवड नस्ती.